**Q.P. Code :08012**

**[वेळ : २१/२ तास]** **[गुण: ७५]**

Please check whether you have got the right question paper.

सूचना : १.सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
२.सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**प्र.१** १९२० ते १९४५ या कालखंडातील सामाजिक चळवळी आणि विचारधारा यांचा साहित्यावर कसा प्रभाव पडतो ते सोदाहरण लिहा. **१५**

**किंवा**

सामाजिक बदलांचा साहित्यावर कसा प्रभाव पडतो याविषयी दि.के.बेडेकर यांनी केलेले विवेचन सविस्तर लिहा.

**प्र.२** बदलत्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण करीत असतानांच ग्रामीण जीवनमूल्ये उठावदार करण्याचा प्रयत्न ग्रामीण साहित्यातून कसा घडतो याचे सविस्तर स्पष्टीकरण दया. **१५**

**किंवा**

'फुलून आला सारा माळ | कापूस नाही कापूसकाळ' या शीर्षकाची समर्पकता 'कापूसकाळ' कादंबरीच्या आधारे स्पष्ट करा.

**प्र.३** 'मानवतावादी जाणीव दलित साहित्याच्या केंद्रस्थानी आहे.' हे विधान योग्य उदाहरणांसह स्पष्ट करा. **१५**

**किंवा**

हिरा बनसोडे यांच्या 'फिर्याद'मधील कवितांमधून मानवतावादी जाणिवा कशा व्यक्त होतात ते लिहा.

**प्र.४** टीपा लिहा **(एकूण तीन)** **१५**

क) १९८० नंतरचे सामाजिक स्थित्यंतर आणि मराठी साहित्य .

**किंवा**

रा.ग.जाधव यांनी स्पष्ट केलेले विवेकनिष्ठ साहित्य

ख) ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा .

**किंवा**

'कापूसकाळ'मधील मधूची व्यक्तिरेखा.

ग) दलित साहित्यातील विद्रोह.

**किंवा**

'फिर्याद' : सांस्कृतिक परंपरांना विरोध.

**(पुढे पहा.)**

**प्र.५** अ) खालीलपैकी **कोणत्याही पाच** प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. १०

१) एकोणिसाव्या शतकातील कोणत्याही दोन महत्त्वाच्या निबंधकारांची नावे सांगा.

२) दि.के.बेडेकर यांच्या मते १९२० नंतर मराठी सुशिक्षितासमोर कोणता परस्परविरोध उभा राहिला?

३) महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह कोणी केला?

४) हिरा बनसोडे यांचा पहिला कवितासंग्रह कोणता?

५) कापूसकाळमध्ये 'सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन लढले पाहिजे' अशा प्रकारचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना कोण करते?

६) जगूची आई घरात का राहत नसे?

७) 'डोहाळे' कवितेतील स्त्रीला कशाचे डोहाळे लागले आहे?

८) कवयित्रीने नेल्सन मंडेला यांना काय संबोधिले आहे?

आ) खालील वाक्यातील गाळलेल्या जागी योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. ०५

१.वर्गविहीन समाज हा अप्राप्य ............. आहे.

क) समाज ख)युटोपिया

ग) संस्कृती घ) माणूस

२.कापूसकाळमध्ये सोसायटीच्या निवडणुकीसाठी जगूला ............. उभे राहण्यास सांगतो.

क) मंगेश ख) तुकाराम माने

ग) बाबू कातखड्या घ) शंकर माने

३. एक नंबरची ग्रेड मिळाली तर प्रतिक्विंटल .................. रुपयांचा भाव मिळणार होता.

क) तेवीसशे ख) पंधराशे

ग) एक हजार घ) दोन हजार

४. भीम ............ रंगाच्या घोडयावर स्वार झाला.

क) काळ्या ख) पांढऱ्या

ग) पिवळ्या घ) निळ्या

५. माणसाला ............ चा डंख झाला आहे.

क) जातीचा व धर्माचा ख) क्रोधाचा

ग) वेदनेच्या दुःखाचा घ) गरिबीचा व श्रीमंतीचा.

---